

स्थापना: जुन १९६४

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

२१३० ई-वॉर्ड, ताराबाई पार्क, ता. करवीर, जिल्हा. कोल्हापूर ४१६००३

यु.जी.सी 2(f) & 12(B) मान्यताप्राप्त

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र) संलग्नित

संकेतस्थळ: www.vivekanandcollege.ac.in ई-मेल: info@vivekanandcollege.org

**परीक्षा विभाग**

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२**

---

दि. 22 / 07 / 2022

## पदव्युत्तर परीक्षा संदर्भातील महत्वाची नोटिस
## (for PG Student)

स्वायत्त महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, जून / जुलै 2022 या सत्राच्या सेमिस्टर दोन व चारच्या परीक्षा दि. 26 जुलै, 2022 पासून सुरु होत आहेत. या परीक्षेसंदर्भात काही विद्यार्थ्यांनी सदर परीक्षा ही MCQ offline असावी, अशी विनंती केलेली होती. त्या संदर्भात आज दि. 22 जुलै, 2022 रोजी परीक्षा मंडळाची बैठक संपन्न झाली. त्या बैठकीत MCQ offline या परीक्षा संदर्भात सविस्तर चर्चा झाली. बैठकीत झालेल्या विचार–विनिमयानुसार परीक्षा पद्धती ठरविण्याचा अधिकार स्वायत्त महाविद्यालयाच्या विद्या परिषदेस (Academic Council) व नियामक मंडळास (Governing Body) आहे. या मंडळाच्या मान्यता घेण्याच्या प्रक्रियेस खूप कालावधी जाणार आहे. त्याचप्रमाणे परीक्षा फॉर्म भरताना परीक्षा पद्धत ठरविण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने परीक्षेची सर्व तयारी झालेली आहे. परीक्षा फॉर्म भरण्याची तारीख व आपल्या मागणी अर्जाच्या तारखेमध्ये खूपच कालावधी गेलेला आहे. त्यामुळे MCQ offline परीक्षा घेणे तांत्रिक दृष्ट्या खूप गुंतागुंतीचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा निकाल लावणेस खूप विलंब होणार आहे. विद्यार्थ्यांचे भविष्यातील शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी व वेळेत परीक्षा निकाल लावणेसाठी, पूर्वी जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार व पूर्वीप्रमाणे जाहिर केलेल्या प्रचलित पद्धतीनेच (Descriptive) परीक्षा संपन्न होतील, याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक
Controller of Examination
Vivekanand Autonomous College, Kolhapur.

प्राचार्य
Chief Controller of Examination
Vivekanand Autonomous College, Kolhapur.